JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# एकविसाव्या शतकातील वैदर्भीय ग्रामीण कादंबरी व मौलिकता

संशोधक

**डॉ. शिवाजी नागरे**
विभाग प्रमुख, मराठी विभाग,
शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान,
व वाणिज्य महाविद्यालय, अकोला

**श्री. विठ्ठल हरिभाऊ सपकाळ**
मो. नं 7972863136
E-mail ID: vitthalsapkal1@gmail.com

संशोधन म्हणजे नवनिर्मिती, नव्याचा शोध! संशोधन या शब्दाला इंग्रजीमध्ये **Research** हा शब्द वापरला जातो. 'रिसर्च' म्हणजे पुनः केलेले शोधन. विविध क्षेत्रात संशोधन सुरू असते. तसेच साहित्य **Literature** या क्षेत्रात सुध्दा संशोधन होत असून साहित्यातील विविध तत्त्वे वा तथ्ये शोधून काढली जात आहेत. ही तत्त्वे वा तथ्ये संशोधनातून शोधून काढतांना संशोधकाने आपला शोधविषय व त्याची उद्दिष्टे यासंबंधी तादात्म्य असणे आवश्यक असते. या संदर्भात डॉ. श. रा. राणे म्हणतात– ''कल्पना करणे तथ्ये मिळविणे, पारखणे यांत अचूकता असावी लागते.''1 संशोधनात 'मौलिकता' हा गुणधर्म खूप महत्त्वपूर्ण असतो. मौलिकता या शब्दाला इंग्रजीमध्ये **Originality** असे म्हणतात. त्याचा मराठीमध्ये अर्थ नव, नवनिर्मित, अभिनव असा होतो. संशोधनात 'मौलिकते'ला खूप महत्त्व आहे. मौलिकता म्हणजेच सत्यता, अस्सलपणा, खरेपणा, खरे असल्याचा गुण! ही मौलिकता संशोधनात उतरल्यास संशोधनविषयाला अस्सलपणा येतो.

एकविसाव्या शतकातील वैदर्भीय ग्रामीण निवडक कादंबरीमधील मौलिकतेचा विचार या लेखात केलेला आहे. वैदर्भीय ग्रामीण वाडमय भाषा, प्रसंग, पात्रे, आशयविचाराच्या दृष्टिने अस्सल आहेत. वैदर्भीय बोलीभाषेतून ग्रामीण जीवनातील वास्तवतेचे चित्रण केलेले आहे. शेतकरी, शेतमजूर, कामगार, शेतीपूरक छोटे व्यावसायिक यांच्या जगण्यातील वेदना, दुःख, राग, किळस यांना कादंबरीचा विषय बनवून त्यांच्या वेदना जगासमोर प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

एकविसाव्या शतकात माणसाच्या जगण्यात आमुलाग्र बदल झालेत. विचार, आचार, विश्वास, ध्येय, प्रेरणास्थाने, कुटुंब, नाते–गोते, प्रेम, यामध्ये क्रांतीकारी बदल, परिवर्तने झालेत. परंतु माणूस म्हणून जगतांना विशेषतः खेडयातील शेतकरी, शेतमजुर, कामगार यांना प्रचंड समस्येला सामोरे जावे लागले. मात्र याकडे समाजाचे वा समाजधुरीणींना हा विषय दुर्लक्षीत केला होतो. त्यांची जगण्याची खंत, वेदना,कुठेतरी शमविली जावी ही अपेक्षा ठेवून दिवस काढणारा माणूस वैदर्भीय कादंबरीमधून व्यक्त होतो. ही मौलिकता कादंबरीकार जपतांना दिसून येतात.

'बारोमास' (2002) या सदानंद देशमुख यांच्या साहित्य अकादमीप्राप्त कादंबरीने शेतक–याचे जीवन त्यांच्या भोवतालचे वास्तव, कर्जबाजारीपणा, यामुळे शेतक–यांच्या जीवनात 'बारोमास' सारखीच परिस्थिती असते. त्यामध्ये काहीच बदल होत नाही. वणव्यामध्ये थोडासा गारवा दिसावा त्याप्रमाणे त्यांचा हंगाम क्षणिक सुखाचे भास निर्माण करतो. एरवी बाराही महिने त्याच्या जीवनात आर्थिकतेचा वणवा पेटलेलाच असतो. ही ओढाताण प्रकर्षाने रेखाटतांना लेखकाने ग्रामीण जीवनाशी, तेथील शेतकरी, शेतकामगाराशी वा त्यांच्या कुटुंबाशी कुठलेही प्रतारणा केलेली नाही. बारोमास कादंबरीमध्ये शेतक–याची दयनीय असस्था पाहून त्याच्या मुलाच्या सोयरिकीचा प्रश्नही कसा बिकट असतो हे पुढील संवादावरून दिसते. ''वावरावाला म्हणून जुळविली नव्हती सोयरिक. एम.ए. बी.एड. पाहून दिल होतं, नोकरी लागेल म्हणून''2 शेतक–याच्या मुलाने स्वप्नही पाहू नये, अशी अवस्था या व्यवस्थेने करून ठेवलेली आहे.

'वारूळ' (2004) या बाबाराव मुसळे यांच्या कादंबरीमध्ये जाती–जातीमधील कलह, व्यक्तिस्वातंत्र्य याबाबत शहरी व खेडूत माणसामध्ये कमालीची तफावत दिसून येते. ही जाणीव प्रकर्षाने मांडलेली आहे. हा फरक रेखाटतांना व खेडूतांच्या समस्येला वाचा फोडतांना लेखक वास्तवतेला आपल्या आशय विषयात कुठेही फाटा देत नाहीत. बोलीभाषेतून शिव्या,शाप, प्रेम, भांडण–तंटे, मांडतांना अस्सलतेला महत्त्व देतात.

'निशाणी डावा अंगठा' (2005) ही रमेश इंगळे–उत्रादकर यांची सुप्रसिध्द कादंबरी. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. परंतु शिक्षणातच काळाबाजार झाला तर, साहजिकच समाजाच्या पर्यायाने देशाच्या प्रगतीला नक्की खिळ बसेल. अशाच शिक्षणाच्या प्रवित्र क्षेत्रातील परिस्थितीचे वर्णन निशाणी डावा अंगठा या कादंबरीमध्ये केलेले आहे. सदर कादंबरीमध्ये शासकीय उपक्रमातील खोटेपणा ,तेथील वास्तवतेचे दर्शन घडविलेले आहे. कादंबरीभर कोठेही लेखक वास्तवाला सोडून दूर जात नाहीत. आशयातील अस्सलपणा, खरेपणा रेखाटतात. व परिस्थितीचे पात्ररूपाने शासकीय उपक्रमाचे पडद्यामागील नागवेपण चित्रीत करतात. त्यामुळे आशयाला व विषयाला अस्सलपणा येतो. कादंबरीतील भाषा, बोली, संवाद, पात्रे, निसर्ग, प्रसंग, ऑफीस, शाळा, वातावरण, म्हणी, चावटपणा यामधून दिसणारी ग्रामीणता व अस्सलपणा मराठी ग्रामीण कादंबरीला नवा आयाम देतो.

'इळनमाळ' (2008) ही अशोक पवार यांची आत्मकथनात्मक वैदर्भीय ग्रामीण कादंबरी. इळनमाळ भटक्या–विमुक्तांच्या जनावरांच्या पातळीवरचे जीणं, त्यांच्या मरणयातना प्रखरपणे चित्रित करते. माणसांच्या मधील व्यसन, दारू, चोरी यांना समाज कसा कारणीभूत आहे हे जोरकसपणे लेखक मांडतात. हाच समाज भटक्या विमुक्तांना इळनमाळ भटकविण्यास भाग पाडतो. तेथील वास्तव मौलिकतेमुळे हृदयाशी थेट भिडते. वास्तवाशी वा विषयवस्तूशी तसूभरही न भटकणारी कादंबरी त्यातील पात्राबरोबर संपूर्ण कादंबरीभर वाचकाला भटकविते. आणि हीच खरी कादंबरीची ताकद आहे.

'पांढर' (2009) ही रवींद्र शोभणे यांच्या कादंबरीने एकविसाव्या शतकात खेडं बदललं. त्यातील माणुसकीची, सुबत्तेची सधनता हरवून निर्धन होत गेलं याचे चित्रण केलं. जागतिकरणामुळे शेतकरी व शेतीवर पोट भरणा–यांच्या जीवावर कसं उठतं याचें चित्रण करतं. पांढर मधील विषयाचं, आशयाचं पात्र प्रसंगातून प्रकटीकरण करतांना गावखेडयातील वास्तवाची नाळ मात्र तुटू दिली नाही. पात्र प्रसंगातून याची स्पष्ट जाणीव होते. पांढर कादंबरीमधील शेतकरी व शेतमजुर यांच्या संवादातून शेतीतील रोजगार व शेतक–याची आर्थिक परिस्थितीचे दर्शन घडवितो. ''गावगाडयातबी असे नागोता का बे?'' या शेतक–याच्या प्रश्नावर शेतमजुर '' यात काय नागवाचं जी ? जमाना पाव्हा ना? समधीकडे माहागाई वाहाडली. वर्सभर रोजगार न्योहता. खान्यापिन्याचे हाल झाले. आता घातंच्या रोजाईमधी तं चार पैसे कमावू द्या बाप्पा.''3 या उत्तराने शेती व्यवसायातील बिकटता, अशाश्वतता, प्रकर्षानं प्रकट होते.. लेखक यांच्यातील वास्तवता जोरकसपणे चित्रित करतात.

'अरण्य काळोख' (2009) या सदानंद सिनगारे यांच्या कादंबरीत शेतक–याची विपन्नावस्था, स्त्रियांच्या वाट्याला आलेलं दुंःख, जीवनमूल्यांचा होत जाणारा –हास, गुन्हेगारी, यामुळे खेडयातील माणसांची जगण्याची भ्रांत मांडलेली आहे. सुखाचा घासही न मिळावा अशी वाट्याला येणारी बिकट परिस्थिती याचे वर्णन केले आहे. मातंग समाजाची आर्थिक विपन्नावस्था केरबा व श्रीपत या पात्रांच्या संवादामधून दिसून येते. शिक्षणापासून दुरावलेला, शिक्षणाचे महत्त्व न कळल्यामुळे परिस्थिती बदलू न शकणारा समाजातील तरूण वर्ग कादंबरीत येतो. पुढील संवादातून शिक्षणाचं महत्त्व कळूनही पोटाची खळगीसाठी आपले जगण्याचे प्राधान्यक्रमर ठरवतो. ''अरे बाबा शिक्षणानं व्यवहाराचं ज्ञान येतं, हिशोब टिशोब समजतो, कुणी सहजासहजी फसवत नाही माणसाला'' ''आहो, कशाचं काय राजाराम भौ, असा कोणता वेव्हार हाये राजेहो आमच्या मांगाम्हारायच्या हातात? कोणत्या दिवानजीले इथं रोजचा हिशोब मांडा लागते? हिथं भोसडीचं दिवसभर उन्हातान्हाचं काटाकुट्यानं टोले घेवा लागतात, तवा कुठी शेर दोन शेर जेवारी भेट्टे. तेचं संध्याकायी रांधून भाकर खाल्ली की ढुंगणले हात पुसले की सगळा हिशोब बरोबर व्हते''4 अशाप्रकारे कादंबरीतील संवाद माणसाला अंतर्मुख करतात. पोंटाची खळगी भरणे हिच मोठी समस्या खेडयातील शेतमजुरांची असते याची प्रकर्षाने जाणीव होते. मग त्याठिकाणी शिक्षण ही दुय्यम बाब ठरते. ही वेदना मांडताना लेखक विषयाशी तादात्म्य झाल्याशिवाय कादंबरीत खरेपणा येत नाही.

अशाप्रकारे एकविसाव्या शतकातील वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतील ''मौलिकता'' ही एकूण ग्रामीण कादंबरी विश्वाला नवा आयाम मिळवून देते. विदर्भ, त्यातील मागासलेपण, शिक्षणाचा अनुशेष, सिंचनाचा अनुशेष अनेक समस्या उभ्या करते. त्यातून वैदर्भीय जीवन पोळल्या जाते. वैदर्भीय खेडुतांच्या जीवघेण्या समस्या, आर्थिक विवंचना, शेतकरी व शेतमजुरांच्या बारोमास असणा–या अडचणी या ग्रामीण कादंबरीला सकस विषय पुरवित गेल्यामुळे वैदर्भीय ग्रामीण कादंबरी दर्जेदार निर्माण झाली. एकविसाव्या शतकात सर्वच क्षेत्रात आमुलाग्र बदल झाले. झपाटयाने होत असलेले शहरीकरण, राहणीमान, जागतिकीकरण, यामुळे विदर्भातील जनजीवन प्रभावित होऊन शेतमजुरांच्या, कामगाराच्या मुलांच्या भवितव्याच्या दृष्टिने अनेक प्रश्न निर्माण झालेत. त्याप्रश्नांना आपल्या कादंबरीत चित्रित करतांना विषयाशी कुठेही प्रतारणा न करता. अस्सलपणा जोपासला गेला आहे. त्यामुळे एकविसाव्या शतकातील वैदर्भीय ग्रामीण कादंबरी ही प्रभावी ठरली. ग्रामीण कादंबरी विश्वात या अस्सलतेमुळेच एकविसाव्या शतकातील वैदर्भीय कादंबरीने आपले स्वतःचे वेगळेपण निर्माण केले यात शंकाच नाही.

## निष्कर्ष

1) एकविसाव्या शतकातील वैदर्भीय कादंबरीने विदर्भातील समस्येला विशेषतः शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नाला सर्वोत्तम महत्त्व दिले.
2) एकविसाव्या शतकातील वैदर्भीय कादंबरीत भाषा, संवाद, पात्रे, कथानक यांच्यातील अस्सलता लक्ष वेधून घेतो.
3) ग्रामीण जीवनातील खरेपणा, समस्या , जीवनजाणिवा रेखाटतांना एकविसाव्या शतकातील वैदर्भीय कादंबरीकार यशस्वी झालेला आहे.
4) संपूर्ण ग्रामीण कादंबरीविश्वात वैदर्भीय कादंबरीने आपले वेगळेपण निर्माण केले आहे.

## संदर्भ ग्रंथसूची


1) डॉ. राणे श. रा., ''मराठी साहित्य संशोधन : स्वरूप आणि दिशा, का.स.वाणी मराठी प्रगत संस्था, धुळे,1995 पृष्ठ क 16
2) देशमुख सदानंद., ''बारोमास'',कॉन्टिनेन्टल प्रकाशन,विजयानगर, पुणे, 2002 पृष्ठ क 21
3) शोभणे रवींद्र., 'पांढर'',मॅजिस्टिक प्रकाशन, गिरगाव, मुंबई, 2009 पृष्ठ क 65
4) सिनगारे सदानंद., 'अरण्य काळोख''स्वरूप प्रकाशन, ,सिडको औरंगाबाद, 2009 पृष्ठ क 120
5) पवार अशोक., 'इळनमाळ'',लोकवाडमय गृह प्रकाशन, मुंबई, 2014
6) इंगळे रमेश., 'निशाणी डावा अंगठा'', ग्रंथाली प्रकाशन, दादर मुंबई, 2009
7) मुसळे बाबाराव., 'वारूळ'', साकेत प्रकाशन, औरंगाबाद 2004
8) आगलावे प्रदीप, 'संशोधन पध्दती शास्त्र व तंत्र'',विद्या प्रकाशन, नागपूर 2018
9) डॉ.शेळके भास्कर.,मराठी प्रादेशिक कादंबरी स्वरूप आणि विश्लेषण'',शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर 2012